॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...



# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

जय हो! ऑपरेशन सिंदूर

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. ११ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३० वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


# पाक सैनिकांकडून युद्धविरामचे उल्लंघन

## सायंकाळी ५ वाजता युद्धविराम । पाकच्या खुमखुमीला जशाच तसे उत्तर देण्यासाठी भारतीय सैनिकांना मुभा

सिमावर्ती भागात ब्लॅक आउट कायम



**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

मागील चार दिवसांपासून भारत–पाकिस्तान यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला होता. हल्ले–प्रतिहल्ले सुरूच होते. अशा स्थितीत पाकिस्तानने अमेरिकेसमोर गुडघे टेकत मध्यस्थी करण्याची विनंती केली. त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींशी संवाद साधून युद्ध थांबविण्याची विनंती केली. त्यावर डीजीएमओच्या पातळीवर संवाद साधल्यानंतर दोन्ही देशांत सामंजस्य करार झाला आणि भारताने महत्त्वाच्या अटी–शर्थींसह युद्धविराम स्वीकारला. परंतु अवघ्या ४ तासांत युद्धबंदीचे उल्लंघन करीत पाकिस्तानने आपले नापाक इरादे स्पष्ट करून दगाबाजीचा चेहरा जगाला दाखविला. भारतानेही आधीच सावध भूमिका घेतली होती. त्यामुळे शस्त्रसंधीचे उल्लंघन करताच भारताने थेट प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली.

युद्धविरामाच्या सामंजस्य करारानुसार शनिवार, दि. १० मे रोजी सायंकाळी ५ वाजता युद्ध थांबविण्याचा निर्णय झाला होता. पाकिस्तानच्या विनंतीनंतर भारताने शस्त्रसंधीचा निर्णय घेतला. त्यानंतर पाकिस्तानचे उपपंतप्रधान इशाक डार यांनी भारतासोबत शस्त्रसंधी झाल्याची माहिती दिली होती. यावर दोन्ही देशांचे लष्करी अधिकारी १२ मे रोजी एकत्रित येऊन चर्चा करण्याचेही ठरले होते आणि पाकिस्तानच्या विनंतीवरून सैनिकी कारवाई थांबवल्याचे भारत सरकारने स्पष्ट केले होते.

यासंदर्भात भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी माहिती दिली होती. पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी आज दुपारी ३:३५ वाजता भारतीय लष्कराच्या महासंचालकांना फोन केला. दोन्ही बाजूंनी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५ वाजल्यापासून जमिनीवर, हवेत आणि समुद्रात सुरू असलेला गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आजपासून सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी दोन्ही बाजूंना सूचना देण्यात आल्या आहेत. लष्कराचे ऑपरेशन्स महासंचालक १२ मे रोजी दुपारी १२ वाजता पुन्हा चर्चा करतील, असे म्हटले होते. परंतु अवघ्या चार तासांत पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले.

तत्पूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत–पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधीसाठी मध्यस्थी केल्याचा दावा केला होता. त्यांनी याबद्दल एक्सवर एक पोस्ट करून अमेरिकेने शुक्रवारी रात्रभर मध्यस्थीसाठी बोलणी केली. त्यात भारत आणि पाकिस्तान पूर्ण आणि तात्काळ शस्त्रसंधीसाठी तयार झाले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, असे ट्रम्प म्हणाले होते. परंतु पाकिस्तानने ४ तासांत शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याने सीमेवर पुन्हा तणाव वाढला आहे. पाकिस्तानने सीमा भागात ड्रोन हल्ले सुरू केले. त्यामुळे अनेक ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आले.

### तणाव कमी करावा : जी ७

■ भारत–पाकिस्तान तणावात जी ७ देशाने प्रतिक्रिया देत दोन्ही देशातील तणाव कमी करण्याचा आग्रह धरला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत–पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला. या दोन्ही देशात सातत्याने एकमेकांवर हल्ले होत आहेत. त्यात जी ७ सदस्य कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, यूनाइटेड किंगडम, अमेरिका आणि युरोपीय संघाने दोन्ही देशातील परराष्ट्र मंत्री आणि प्रतिनिधींशी तणाव कमी करण्याचं आवाहन केले आहे. दोन्ही देशातील नागरिकांच्या सुरक्षेची आम्हाला चिंता वाटते. त्यामुळे दोन्ही देशांनी तात्काळ तणाव कमी करावा.

### पाककडून शस्त्रसंधीचे उल्लंघन गंभीर बाब : मिस्त्री

■ युद्धबंदी झाल्यानंतरही सीमेपलिकडून गोळीबार सुरू आहे. अवघ्या काही तासांतच पाकने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. ही अतिशय निंदनीय आणि गंभीर गोष्ट आहे. पाकिस्तानने ही गोष्ट गंभीरपणे घ्यावी आणि योग्य ती कार्यवाही करून गोळीबार थांबवावा. या उलट भारतीय सैन्याला कडक पावले उचलण्याचे आदेशही दिल्याचे असे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी सांगितले. युद्धबंदी करार मान्य करून युद्ध थांबविण्याचा निर्णय घेतला असतानाही शस्त्रसंधीचे उल्लंघन करीत पाकिस्तानी सेनेने जम्मू, राजस्थान, पंजाब या सीमाभागातील राज्यांवर हवाई हल्ले केले. या सर्व घडामोडीनंतर आता भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली. कोणत्याही अतिक्रमणाचा सामना करण्यासाठी ठोस आणि कठोर पाऊल उचलण्याचा आदेश देण्यात आला आहे. त्यासाठी भारतीय लष्कराला थेट कारवाईची मुभा दिली आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव मिस्त्री यांनी सांगितले.

## ऑपरेशन सिंदूरमध्ये पाच दहशतवादी ठार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

भारताने २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्याचा बदला ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरने घेतला. या कारवाईत मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची यादी आज एएनआय या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केली आहे. कंधार विमान अपहरणाचा मास्टरमाइंड मोहम्मदसह ५ जणांची नावे आहेत. मुंबई हल्ल्यात सहभागी असलेला युसूफ अझहर आणि अबू जुंदाल यांचा समावेश आहे. युसूफ अझहर हा जैश–ए–मोहम्मदचा प्रमुख मसूद अझहरचा नातेवाईक आहे.

शनिवारी सकाळी १०:३० वाजता पाकिस्तानी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून केलेल्या कारवाईची माहिती भारतीय संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयाने दिली. कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या की, भारताने ८ लष्करी तळांवर हल्ला केला. यामध्ये पाकिस्तानी हवाई तळ आणि शस्त्रास्त्रे डेपोंचा समावेश आहे. बीएसएफने एक व्हिडिओ जारी करत पाकिस्तानातील सियालकोटमधील लुनी येथे दहशतवादी लाँचपॅड नष्ट करण्यात आल्याचे सांगितले.

शुक्रवारी संध्याकाळी ७.४७ ते १०.५७ दरम्यान पाकिस्तानने जम्मू–काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरातमधील २६ शहरांमध्ये ५५० हून अधिक ड्रोन डागले. हा हल्ला भारतीय सैन्याने हाणून पाडला. शनिवारी सकाळी पाकिस्तानने पुन्हा जम्मू–काश्मीर, पंजाब, राजस्थान, हरियाणा आणि गुजरातवर हल्ला केला. या गोळीबारात राजौरीच्या एका प्रशासकीय अधिका–यासह पाच जणांचा मृत्यू झाला. जम्मू शहरातही हवाई हल्ले सुरूच आहेत. अनेक इमारतींचे नुकसान झाले.

ऑपरेशन सिंदूर ७ मे रोजी मारले गेलेले दहशतवादी, यादी आज आली भारताने ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर चालवले. यात मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांचा तपशील तीन दिवसांनी उघड झाला. वृत्तसंस्था एएनआयने सूत्रांच्या हवाल्याने या दहशतवाद्यांबद्दल माहिती दिली आहे.

१. मुदस्सर खादियान उर्फ अबू जुंदाल: लष्कर–ए–तैयबाचा दहशतवादी. मुरीदके येथील मरकज तैयबाचा प्रभारी. अंत्यसंस्कारात पाकिस्तानी सैन्याने गार्ड ऑफ ऑनर दिला.

२. हाफिज मुहम्मद जमील: जैश–ए–मोहम्मदचा मोठा दहशतवादी. मौलाना मसूद अझहरचा मोठा मेहुणा. बहावलपूरमधील मरकज सुभान अल्लाहचा प्रभारी. तरुणांना कट्टरतावादी बनवण्यात आणि निधी पुरवण्यात सक्रिय होता.

३. मोहम्मद युसूफ अझहर उर्फ उस्ताद जी, मोहम्मद सलीम, घोसी साहब: जैश–ए–मोहम्मदचा दहशतवादी आणि मसूद अझहरचा मेहुणा. दहशतवादी संघटनेत शस्त्रास्त्र प्रशिक्षणाचा प्रभारी. जम्मू आणि काश्मीरमधील अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये सहभागी होता आणि आयसी–८१४ विमान अपहरण म्हणजेच कंधार अपहरणाच्या कटात सहभागी होता.

४. खालिद उर्फ अबू अकाशा: लष्कर–ए–तैयबाचा दहशतवादी. अफगाणिस्तानातून शस्त्रास्त्रांची तस्करी करण्यात सहभागी होता. जम्मू आणि काश्मीरमधील अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये सहभागी. फैसलाबादमध्ये अंत्यसंस्कार झाले. पाकिस्तानी लष्करी अधिका–यांनीही त्यात सहभाग घेतला.

५. मोहम्मद हसन खान: जैश–ए–मोहम्मदचा दहशतवादी. वडील मुफ्ती असगर खान काश्मिरी, पीओकेमधील जैशचे ऑपरेशनल कमांडर. जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यांच्या नियोजनात मोहम्मद हसनने महत्त्वाची भूमिका बजावली.

## यापूढे दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाणार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

सध्याच्या भारत–पाकिस्तान वाढत्या तणावादरम्यान भारताने मोठा निर्णय घेतला असून, भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. त्यानुसार त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. याबाबतची माहिती सुत्रांनी दिली आहे.

तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पश्चिम सीमेवरील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उच्चपदस्थ अधिका–यांसोबत बैठक घेतली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आणि तिन्ही दलांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यापूर्वी, चौहान यांनी सिंह यांना सुरक्षेच्या परिस्थितीची माहिती दिली होती.

## राज्यभरात आज तिरंगा रॅली

**● मुंबई । वीरभूमी–**

राज्यातील महायुती सरकारकडून विविध जिल्ह्यात ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ रविवार दि. ११ मे रोजी पायी यात्रेचे आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. त्यानंतर, भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ अनेक जिल्ह्यात ही रॅली निघणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही या रॅलीत सहभाग असणार आहे. यांसह, महायुतीमधील अनेक मंत्री आपल्या आपल्या जिल्ह्यातून या रॅलीत सहभाग घेणार आहेत. मात्र, राष्ट्रवादीकडून तिरंगा रॅलीचे नियोजन नसून अजित पवार हे नांदेड दौ–यावर आहेत. ते शहीद कुटुंबीयांची भेट घेणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्या रविवारी नागपुरात तिरंगा रॅली निघणार असून ऑपरेशन शिंदूर'च्या समर्थनार्थ ही तिरंगा रॅली काढण्यात येत आहेत. या तिरंगा रॅलीत मोठ्या प्रमाणात नागपूरकर सहभागी होणार आहेत. शहरातील लॉ कॉलेज चौक ते शंकर नगर चौक दरम्यान तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: सकाळी ८ वाजता तिरंगा रॅलीत पायी सहभागी होणार आहेत.

## यंदा वेळेआधीच धडकरणार मान्सून

### केरळमध्ये २७ मेपर्यंत मान्सूनचे आगमन । हवामान विभागाकडून आनंदवार्ता

**● मुंबई । वीरभूमी–**



अंदमानच्या समुद्रात यंदा लवकर दाखल होणारा मान्सून पुढचाही प्रवास लवकर करत भारताच्या भूमीवरही लवकर दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने शनिवारी या संदर्भातील आनंदवार्ता दिली असून २७ मे रोजी मान्सून केरळमध्ये पोहोचू शकतो. १३ मेपर्यंत दक्षिण अंदमानचा समुद्र, बंगालच्या उपसागराचा आग्नेय भाग आणि निकोबार बेटांपर्यंत मान्सून पोहोचण्याचे पूर्वानुमानही शनिवारी वर्तवण्यात आले.

केरळमध्ये दाखल होण्याचा सर्वसाधारण दिवस १ जून आहे. मात्र यंदा मान्सूनचा अंदमानच्या समुद्रापर्यंतचा प्रवासही आधी सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर मान्सूनचा पुढचा प्रवासही सुरळीत पार पडण्याची शक्यता आहे. केरळमधून देशात मान्सून दाखल होण्याच्या आधी वातावरणात बदल नोंदवला जातो. कोरड्या आणि उष्ण वातावरणानंतर पावसाळी वातावरण जाणवू लागते. १ जूनला मान्सून दाखल होईल, असा अंदाज वर्तवताना यामध्ये मान्सून आगमनाच्या तारखेच्या पुढे– मागे सात दिवसांचा कालावधी गृहीत धरला जातो. गेल्या पाच वर्षांमध्ये दोनवेळा मान्सून १ जूनच्या आधी केरळमध्ये दाखल झाला होता. २०२४ मध्ये ३० मे तर २०२२ मध्ये २९ मे रोजी मान्सून केरळमध्ये धडकला. २०२२ मध्ये २७ मे रोजी मान्सून दाखल होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता तर, २०२४ मध्ये ३१मेरोजी मान्सून दाखल होण्याचा अंदाज होता. केरळमध्ये मान्सून दाखल होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभाग२००५ पासून वर्तवण्यात येत आहे.

मान्सून दाखल होण्याचा अंदाज वर्तवण्यासाठी सहा निकष मानले जातात. यामध्ये वायव्य भारतातील किमान तापमान, दक्षिण द्वीपकल्पामध्ये मान्सूनपूर्व काळामध्ये पडणारा पाऊस, इंडोनेशियावरील वरच्या थरातील उष्णकटिबंधीय क्षेत्रीय वारा, ईशान्य हिंदी महासागरावरील खालच्या थरातील उष्णकटिबंधीय क्षेत्रीय वारा, दक्षिण चीन समुद्रावरील थर्मल रेडिएशन, उष्णकटिबंधीय वायव्य प्रशांत महासागरावरील समुद्रसपाटीचा सरासरी दाब हे घटक लक्षात घेऊन अंदाज वर्तवला जातो.

# ओडीसातून आलेला गांजा राहात्यात पकडला

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई । १३ किलो गांजासह एकाला अटक

**● राहाता । वीरभूमी–**
राहाता येथे ओडीसा राज्यातून विक्रीसाठी आलेला १३ किलो गाजा स्थानिक गुन्हे शाखेने जप्त पकडला. एका आरोपीला पकडण्यात यश आले असून त्याच्याकडून १३.३१८ किलो गांजासह १० लाख ८१ हजार ३६० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना आदेश दिले. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील पोसई तुषार धाकराव, पोलीस अंमलदार अरूण गांगुर्डे, संतोष खैरे, रोहित मिसाळ, बाळासाहेब खेडकर, फुरकान शेख व प्रशांत राठोड यांचे पथक नेमून जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्याच्या सुचना करुन पथकास रवाना केले. गुरुवारी हे पथक राहाता पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्याची माहिती काढत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार काळ्या रंगाची इको स्पोर्ट कार (क्रमांक एमएच–१५–ईक्यु–९२२२) व पांढऱ्या रंगाची स्विफ्ट कार (क्रमांक एमएच–१७–सीएक्स–४४६६) या गाडीमधील चार जणांनी दिनांक ७ मे रोजी



ओडीसा राज्यातून गांजा विक्रीसाठी आणला असून ते राहाता शिर्डी रोडने जाणार आहे. पथकाने मिळालेली माहिती पो. नि. नितीन चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांना दिली. त्यांच्या आदेशावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच राहाता पोलीस स्टेशनचे पो. नि. नितीन चव्हाण, पोसई सोळंखे व पोलीस अंमलदार धिरज अभंग, अनिल गवांदे, प्रभाकर शिरसाठ, एस. एन. अनारसे यांचे संयुक्त पथक तयार केले.

पथकाने साकुरी शिवारातील हॉटेल समाधान येथे सापळा रचुन काळ्या रंगाची इको स्पोर्ट कार व पांढऱ्या रंगाची स्वीफ्ट कार ही वाहने एका पाठोपाठ येताना दिसली.

पथकाने दोन्ही वाहनांना थांबविण्याचा इशारा केला. काळ्या रंगाची कार चालकाने वाहन रस्त्याचे कडेला पथकापासून थोडे अंतरावर थांबविली. त्यापाठीमागील स्वीफ्ट कार चालकाने कार न थांबविता भरधाव वेगाने निघून गेला. पथकातील पोलीस कार कडे

जात असताना एक इसम पळून गेला. वाहन चालक पळून जाण्याच्या तयारीत असताना पथकाने त्यास पकडले. अरूण मोतीलाल विश्वकर्मा, रा. गितराम सोसायटी, दत्तमंदीर, नाशिक रोड, नाशिक यास ताब्यात घेतले. पथकाने आरोपीची व वाहनाची तपासणी केली. त्याच्याकडे १५ हजारचा एक मोबाईल, २ लाख ६६ हजार ३६० रुपये किंमतीचा ऐवज त्यात १३.३१८ किलो अंमली पदार्थ व ८ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल त्यात फोर्ड कंपनीची इको स्पोर्ट कार असा एकूण १० लाख ८१ हजार ३६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता त्याने सदरचा माल हा नशेसाठी वापरला जात असून तो त्याचा साथीदार नितीन उर्फ आण्णा जाधव, रा. निमगाव कोऱ्हाळे, शिर्डी (फरार) तसेच पळून गेलेल्या स्वीफ्ट कारमधील साईनाथ उर्फ शिरीष गायकवाड, रा. शिर्डी पुर्ण नाव माहित नाही (फरार) व स्वीफ्ट कारचा चालक (नाव माहित नाही) (फरार) यांनी ओडीसा राज्यातून जयराम (पूर्ण नाव माहित नाही) याच्याकडून जप्त केलेला मुद्देमाल व स्वीफ्ट कारमध्ये असलेला ४० किलो गांजा खरेदी करून विक्रीसाठी आणल्याची माहिती सांगितली.

आरोपीविरूध्द राहाता पोलीस ठाण्यात गु.र.नं. २११/२०२५ एनडीपीएस ॲक्ट कलम ८ (क), २० (ब) (आयआय) (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यातील आरोपीस जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासह राहाता पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असुन गुन्ह्याचा पुढील तपास राहाता पोलीस करीत आहेत.

# SPOT NEWS

## जेलमधून पळण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला पोलिसाने पकडले

**● कर्जत । वीरभूमी–**
येथील कारागृहातील बराकीचे दोन गज कापून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला बंदोबस्तावरील पोलिसाने झडप घालून पकडले. मात्र, त्यावेळी झालेल्या झटापटीत पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. ही घटना दुय्यम कारागृहात बुधवारी (दि. ७) सकाळी ७.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत पोलीस कॉन्स्टेबल लह रामा घोलवाड (वय ३३) यांनी फिर्याद दिली आहे. हा आरोपी खुनाच्या गुन्ह्यातील असून, गेल्या अकरा महिन्यांपासून तो कारागृहात आहे. दुय्यम कारागृहात आरोपी तलाश उर्फ धाब्या उर्फ तुषार रंजा उर्फ शिवा काळे (वय २६) हा गेल्या अकरा महिन्यांपासून खुनाच्या गुन्ह्यात कैदेत आहे. त्याला बराक तीनमध्ये ठेवण्यात आले होते. बुधवारी सकाळी ७.१५ सहायक पोलीस निरीक्षक रमिज मुलानी आरोपींना न्यायालयीन कामासाठी बाहेर काढत असताना आरोपी तलाशने लॉकअप समोरील बाजूचे दोन गज कशाच्या तरी साहाय्याने कापून तो पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना बंदोबस्तासाठी असलेले पोलीस लहू घोलवाड यांच्या निदर्शनास ही घटना आली. त्यांनी आरोपी तलाशला झडप घालून पकडले. त्यावेळी त्याने घोलवाड यांच्याशी झटापट केली. यात ते जखमी झाले. मात्र, त्यांनी आरोपीला पकडून ठेवले. आरडाओरडा ऐकून इतर पोलिस कर्मचारी तेथे आले. त्यांनी आरोपीला पकडून पुन्हा कारागृहात बंदिस्त केले. त्यानंतर जखमी घोलवाड यांच्या फिर्यादीवरून कर्जत पोलिस ठाण्यात आरोपी तलाश याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना समजताच उपविभागीय पोलिस अधिकारी विवेकानंद वाखारे, पोलिस निरीक्षक दौलतराव जाधव यांनी भेट देत माहिती घेत खबरदारीच्या सूचना दिल्या.

## माळीवाडा परिसरात ड्रग्ज विक्री करतांना दोघांना पकडले

**● नगर । वीरभूमी–**
माळीवाडा परिसरातील पृथ्वीराज लॉजचे पाठीमागे राहत्या घरात मेफेंटरमाईन सल्फेट इंजेक्शन व गांजा विक्री करण्यासाठी बाळगणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्याकडून सव्वातीन किलो गांजा व इंजेक्शनच्या सात बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. गुरुवारी रात्री पोसई गणेश देशमुख हे पेट्रोलिंग करत असताना माळीवाडा परिसरातील पृथ्वीराज लॉजमागे घरात दोन इसमांनी मेफेंटरमाईन सल्फेट इंजेक्शन व गांजा विक्री ठेवल्याची माहिती मिळाली. त्यानुसार उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली पोलिसांच्या पथकाने छापा टाकून दोघांना ताब्यात घेतले. घरामधील वरच्या मजल्यावरील दिवाणच्या कप्यामध्ये इंजेक्शनच्या सात बाटल्या व ३.३१० किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी तो जप्त करून शाहरुख अस्लम मनियार (वय २८) व सैजल अस्लम मनियार (वय २६, दोघेही रा. पृथ्वीराज लॉजमागे माळीवाडा) यांना ताब्यात घेतले. मपोहेकॉ रोहीणी अशोक दरंदले यांच्या फिर्यादीवरुन दोघांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोसई गणेश देशमुख करत आहेत. उपअधीक्षक अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक प्रताप दराडे, पोसई देशमुख, पोसई कृष्णकुमार सेदवाड, अंमलदार रोहिनी दरंदले, राजेंद्र औटी, विशाल दळवी, संदिप पितळे, दिपक रोहकले, तानाजी पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## गुंडेगावच्या रुकसाना सय्यदची पुणे कारागृह पोलिसपदी निवड

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही शिखर गाठता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे नगर तालुक्यातील गुंडेगाव येथील रुकसाना अशीर सय्यद. सामान्य कुटुंबातील या मुलीने पुणे कारागृह पोलिसपदी निवड होऊन आपले स्वप्न साकार केले आहे.

रुकसाना ही गुंडेगावातील साध्या कुटुंबातील मुलगी. तिचे वडील खेड्यापाड्यात कुल्फीचा व्यवसाय करतात. मोठे चूलते शकील सय्यद आणि छोटे चूलते समीर सय्यद यांचे तिला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. दीड वर्षांपूर्वी इनामगाव येथील पिरजादे कुटुंबात तिचा विवाह झाला. पोलिस होण्याचे स्वप्न बाळगलेल्या रुकसानाला पती आणि सासू–सासऱ्यांनी खंबीर पाठबळ दिले. यापूर्वीच्या पोलिस भरती परीक्षेत काही गुणांनी संधी हुकल्यानंतरही रुकसानाने हार मानली नाही.



नुकत्याच झालेल्या कारागृह पोलिस परीक्षेत तिने यश मिळवत पुणे येरवडा कारागृहात पोलिस कर्मचारीपदी निवड झाली. पण तिची स्वप्ने यापुरती मर्यादित नाहीत. स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी होण्याचा तिचा मानस आहे.रुकसानाच्या या यशाबद्दल गुंडेगाव आणि इनामगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## धोत्रे गावच्या उपसरपंचपदी कोल्हे गटाचे भाऊसाहेब गागरे बिनविरोध

**● कोपरगाव । वीरभूमी–**
कोपरगाव तालुक्यातील पूर्व भागातील धोत्रे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी कोल्हे गटाचे श्री.भाऊसाहेब गागरे यांची लोकनियुक्त सरपंच प्रदीप चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तसेच निवडणूक निर्णय अधिकारी श्री.अविनाश पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी दिनांक ८ मे २०२५ रोजी झालेल्या सभेत बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



याप्रसंगी संजीवनी पतसंस्थेचे संचालक श्री.सुरेश जाधव, श्री.भगवान चव्हाण, सौ.आरती राजेंद्र जामदार, सौ.भारती विजय जामदार, सौ.शितल नामदेव चव्हाण, श्री.आजम शेख, श्री.मच्छिंद्र गायकवाड,श्री. कैलास चव्हाण, सौ.शीला पगारे आदी ग्रामपंचायत सदस्य हजर होते.

यावेळी सरपंच प्रदीप चव्हाण यांनी बोलताना सांगितले की, तालुक्यातील पूर्व भागातील धोत्रे गाव राजकीय दृष्ट्या अत्यंत संवेदनशील गाव असून संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा नेते सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. विवेकभैय्या कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली गावात वेगवेगळे विकासाचे कामे सुरू असून विविध शासकीय योजना गरजू साठी राबविल्या जात असल्याचे सांगत सर्वांना सोबत घेऊन सर्वांच्या विचाराने सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी करत संपूर्ण विकसित गाव करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत चव्हाण यांनी नवनिर्वाचित उपसरपंच गागरे यांचे अभिनंदन केले.

तसेच संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे, युवा नेते सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विवेकभैय्या कोल्हे यांनी देखील उपसरपंच गागरे यांचे अभिनंदन करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अकोले बस आगाराची स्वच्छता पथकाकडून पाहणी

**● अकोले । वीरभूमी–**
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे हिंदु ह्यदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियानाचे पथकाकडुन अकोले बस आगाराची पाहणी करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे वतिने राज्यातील ब वर्ग बस आगाराचे हिंदु ह्दयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियान अंतर्गत राज्यातील तिन आगारानां श्रस्वच्छ, सुंदर आगारांना पारितोषिक देण्यात येणार आहे. यामध्ये प्रथम क्रमांक येणाऱ्या आगाराला ५० लाख रुपये द्वितीय क्रमांकाला २५ लाख रुपये तर तृतीय क्रमांकाला १५ लाख रूपये बक्षीस जाहिर करण्यात आले आहे. या अभियानात अकोले बस आगाराचाही समावेश असुन आज शुक्रवारी हिंदु ह्दयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियानाचे पथक अकोले आगारात येवून पाहणी केली.



यावेळी त्यांनी बसस्थानक स्वच्छता, आगारातील स्वच्छता, सुलभ सौशालय स्वच्छता, हिरकणी कक्ष, चालक–वाहक विश्रामगृह, महिला विश्रामगृह, गॅरेज विभाग तसेच आवारातील पार्किंग सुविधा झाडे याची पाहणी करुन गुणांकन देण्यात आले आहे. या पथकात सोलापूर येथील विभागीय वाहतूक अधिक्षकश्री परशुराम लकाते, विभागीय कर्मचारी वर्ग अधिक्षक, सोलापूर सौ. मालन बनसोडे व प्रवासी संघटना अध्यक्ष रणजित श्रीगोड हे होते.

सदर पथकाचे अकोले आगाराचे आगारप्रमुख सुरेशराव दराडे यांनी स्वागत केले तर यांप्रसंगी वाहतूक निरिक्षक सागर सांगळे, सहाय्यक वाहतूक निरिक्षक प्रणव भापकर, लेखापाल श्री. कोपरे, वरिष्ठ लिपिक सचिन वाकचौरे, कविता नागरे, दत्तात्रय कर्डिले, अजित छापेकर, वाहतूक नियंत्रक अशोक कडलक, वाहतूक नियंत्रक श्री. धोंगडे, श्री. टी. आय. लोकरे, श्री. बगनर, सखाराम नाडेकर, अनिता कैलास धराडे (लिपिक), निशा विलास आंबेकर (लिपिक) आदी उपस्थित होते.

यावेळी अकोले आगाराची पाहणी केल्यानंतर सदर पथकातील अधिकाऱ्यांनी आगाराची स्वच्छता व नफ्यात असलेला अकोले डेपो पाहुन समाधान व्यक्त करत आमचा अहवाल गेल्यानंतर उच्चस्तरीय कमेटीचे पथक पाहणी करण्यास येणार असल्याचे सांगितले. तर अकोले आगार हिंदु ह्दयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियानात निश्चित नंबर पटकावेल असा विश्वास आगार व्यवस्थापक श्री सुरेश दराडे यांनी व्यक्त केला.

## मुलीस कोर्टातून नोटीस पाठवली म्हणून माय-लेकास मारहाण

**● राहुरी । वीरभूमी–**
कोर्टातून मुलीला नोटीस पाठवली म्हणून आरोपींनी दोघा माय लेकाला लाकडी दांडा व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द येथे घडली. अक्षय डेव्हीड साळवे (वय २७, रा. राहुरी खुर्द) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, अक्षय साळवे यांचे लग्रा नंतर त्यांची पत्नी सासरी नांदण्यास आली. परंतु नंतर ती नेहमी माहेरी जात असे व मनाला वाटेल तेव्हा नांदण्यास येत असे. सध्या ती नांदत नसुन पत्नी माहेरी राहते. त्यामुळे अक्षय साळवे यांनी पत्नी विरुध्द कोर्टात तक्रार दिली आहे. त्याबाबत वकिला मार्फत पत्नीस नोटीस पाठविली आहे. सदर नोटीस पाठविल्याचा पत्नी व तिचे माहेरच्या नातेवाईक अक्षय साळवे याचा राग आला. त्यानंतर दि. ७ मे रोजी सांयकाळी ५ वाजता अक्षय साळवे व त्यांची आई घरी असताना तेथे आरोपी आले. त्यांनी अक्षय साळवे व त्यांच्या आईला शिवीगाळ करून तुम्ही आमच्या मुलीस कोर्टातुन नोटीस पाठवता काय ? आम्ही आता तुमच्याकडे पाहुन घेतो, असे म्हणुन आरोपींनी त्यांना लाकडी दांडा व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच आम्ही तुम्हाला आजची संध्याकाळ पाहू देणार नाही, असा दम दिला. या भांडणामध्ये अक्षय साळवे यांच्या खिशातील मोबाईल काढुन घेतला. तसेच त्यांच्या आईचे गळयातील पोत तुटुन गहाळ झाली. अक्षय डेव्हीड साळवे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी पल्लवी अक्षय साळवे, मंदा प्रकाश रोकडे, विश्वास प्रकाश रोकडे, प्रकाश क्षीरसागर, सुनिता प्रकाश क्षीरसागर, सुमित्रा साहेबराव भिसे (सर्व रा. राहुरी खुर्द) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS



## सावध चित्ताने कथा श्रवण करावी : योगेश महाराज

**कोपरगाव । वीरभूमी-**

कथा श्रवणात चित्त नसेल तर काहीच अर्थ नाही. सावधान चित्ताने कथा श्रवण केली तर त्या जीवाचे कल्याणच होते असे प्रतिपादन योगेश महाराज यांनी केले आहे. तालुक्यातील कान्हेगाव येथे श्री नरसिंह जयंती उत्सवाच्या निमित्ताने कथेचे आयोजन करण्यात आले असून सहावे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. प्रत्येकाला सुख समाधानाची आवश्यकता आहे .ते सुख फक्त भगवंताच्या चरणा जवळ आहे. भगवंताकडे सुख आहे म्हणूनच आता श्रवण करायची आहे ज्याकडे सुख आहे तिकडेच आपण गेलो पाहिजे इकडे तिकडे भरकटून काही उपयोग नाही. भगवान परमात्मा सर्व सुखाचे आगार आहे. आपल्या घरात बिगर कष्टाचा आलेला पैसा कधीच सुख समाधान देत नाही म्हणून स्वतःच्या कष्टाने कमावलेला पैसा नक्कीच सुख देतो, असे यावेळी सांगितले. यावेळी महाराजांनी श्री वामन अवतार व परशुराम अवतार यांची कथा विषद केली. कथेप्रसंगी संगीत साथ हभप. गोंडे महाराज, तुपे महाराज यांनी केली तर कथा श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने परिसरातील भाविक उपस्थित होते.

## ट्रकच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**नगर । वीरभूमी-**

अहिल्यानगर- करमाळा रस्त्यावर शिराढोण (ता. अहिल्यानगर) गावच्या हद्दीत माळवाडी परिसरात गुरूवारी (८ मे) सकाळी ११.४५ च्या सुमारास ट्रक व दुचाकीच्या भीषण अपघातात तरूणाचा मृत्यू झाला. प्रवीण भगवान वाघ (वय ३०, रा. शिराढोण) असे मयत तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी ट्रक चालक धरमपाल शंकरलाल शर्मा (रा. परतापुर, ता. तुंडला, जि. फिरोजाबाद, उत्तर प्रदेश) याच्याविरोधात अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरीष मोहन वाघ (वय २८ रा. शिराढोण) यांनी फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण वाघ हे त्यांची दुचाकी (एमएच १६ सीआय ७४०५) घेऊन अहिल्यानगर-करमाळा रस्त्याने जात असताना शिराढोण गावच्या परिसरात भरधाव वेगात आलेल्या ट्रकने (आरजे ११ जीसी ३५४१) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका जबरदस्त होता की प्रवीण वाघ यांचा मृत्यू झाला.

## सौ. चांगुणाबाई बनसुडे यांचे निधन

**श्रीगोंदा । वीरभूमी-**



सौ.चांगुणाबाई उर्फ भागुबाई शिवराम बनसुडे (वय ७८ वर्षे) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर श्रीगोंदा - बाबुर्डी रोड स्मशानभूमी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन सुना, एक मुलगी व नातवंडे असा मोठा परिवार आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष व वृत्तपत्र विक्रेते माधव शिवराम बनसुडे यांच्या त्या मातोश्री होत.

# काजवा संगोपनाला वनविभागाकडून महत्व

## विश्रामगृहावर वनविभागाची महत्वपूर्ण बैठकीत घेतला निर्णय

**अकोले । वीरभूमी-**

भंडारदऱ्याच्या कळसुबाई हरिश्चंद्र अभयारण्य मध्ये दिसणारा काजव्यांच्या लखलखाट पाहण्यासाठी होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण मिळविण्यासाठी कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या विश्रामगृहावर महत्वपूर्ण बैठक पार पडली असुन यावेळी या बैठकीत काजव्यांच्या संगोपनाला महत्त्व दिले जाणार असल्याचे स्पष्ट संकेत वन विभागाने दिले आहेत.



अकोले तालुक्यातील भंडारदर्याच्या कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यामध्ये दरवर्षी १५ मे १५ जुन या कालावधीमध्ये दरवर्षी काजव्यांचा लखलखाट बघावयास मिळत असतो . काजव्यांचा हा करिष्मा बघण्यासाठी भंडारदर्याच्या अभयारण्यास महाराष्ट्रासह परराज्यातुनही पर्यटकांचा उदंड प्रतिसाद मिळत असतो . त्यामुळे या कालावधीत भंडारदर्याला पर्यटकांची जत्रा भरलेली दिसुन येते . पर्यटकांची वाढलेली संख्या काजव्यांच्या विनाशाला कारणीभुत ठरत असल्याचे निसर्गप्रेमींचे म्हणणे असल्याकारणाने संगमनेर येथील एका निसर्ग मित्राने थेट राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात धाव घेत काजवे वाचविण्यासाठी प्रयत्न केला आहे . त्यासाठी पर्यटकांच्या होणाऱ्या अवाढव्य गर्दीला कुठेतरी लगाम लागावा असे निसर्ग मित्राचे म्हणणे आहे. राष्ट्रीय हरित न्यायालयात निसर्गप्रेमी गेल्यामुळे यावर्षीचा भंडारदर्याचा हा काजवा महोत्सव अगदी शांततेमध्ये तसेच काजव्यांचे संगोपन कसे होईल याचा विचार करून आदिवासी बांधवांच्या रोजंदारीला कुठेही बाधा येणार नाही याची काळजी घेत वन्यजीव विभागाच्या कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारणाकडुन विशेष काळजी घेतली जाणार आहे.

यासाठी भंडारदरा येथील विश्रामगृहावर एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली असुन या बैठकीसाठी कळसुबाई हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी अनिल पवार, भंडारदरा विभागाचे वनपरिक्षेत्राधिकारी रुपेश गावित, राजुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक सरोदे, वनविभागाचे वन कर्मचारी तसेच परिसरातलील तंबुधारकही उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये काजव्यांच्या संगोपनाला महत्त्व देणारा असल्याचे वनविभागाने सांगितले असून नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश वनविभागाने दिले आहेत. प्लास्टिक वापरावर नियंत्रण आणणे, गाड्यांच्या प्रकाश झोतावर नियंत्रण आणण्यासाठी अंधार पडण्याच्या आत कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य पर्यटकांना प्रवेश दिला जाणार असुन वनविभागाच्या टोलनाक्यावर पोलीस तसेच वन विभागाकडून गाड्यांची कसून तपासणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

अभयारण्यात कर्कश हॉर्न वाजवण्यास, डीजे लावण्यास, तसेच पर्यटकांनी आपल्या गाड्या वाहन तळावरच पार्क करण्याचे आदेश देण्यात आले. रात्री नऊ वाजेपर्यंतच पर्यटकांना अभयारण्यात प्रवेश मिळणार असून रात्री दहा वाजेच्या आत अभयारण्यातून कोणत्याही परिस्थितीत पर्यटकांना बाहेर पडावे लागणार आहे. काजवे बघताना पर्यटकांनी धांगडधिंगा न करता शांततेत निसर्गाचा करिष्मा बघावा, काजव्यांच्या झाडाला हलवू नये तसेच मोबाईलच्या प्रकाश झोतावर बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत वन विभागाने दिले आहेत.

### अवकाळीमुळे लवकरच काजवा महोत्सव

भंडारदरा परिसरामध्ये मंगळवार व बुधवारी काही प्रमाणात अवकाळी पाऊस झा ला आहे. याकारणाने भंडारदऱ्यात लवकरच काजव्यांचे आगमन होणार असुन या वर्षी एक आठवडा लवकरच काजवे दिसण्यास सुरुवात होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## अकोलेचे ग्रामदैवत महालक्ष्मी देवस्थान विस्तारित सभागृहाचे भूमिपूजन



**अकोले । वीरभूमी-**

येथील पुरातन ग्रामदैवत महालक्ष्मी देवस्थान ट्रस्ट च्या नूतनीकरणांतर्गत पूर्वेकडील सभागृहानजीक असणाऱ्या नियोजित विस्तार कामाचे भूमिपूजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त तथा नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांनी दिली.

देवस्थानचे अध्यक्ष किसन लहामगे, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, डॉ. सुनील शिंदे, बाळकृष्ण लोंढे, खंडू भरीतकर, रामनिवास राठी, रमेश नाईकवाडी, भानुदास वाकचौरे, संजय जाधव आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते तसेच त्यांच्या उपस्थितीत भूमीपूजन सोहळा पार पडला.

महाराष्ट्रात महालक्ष्मीची देवस्थाने मोजकी आणि दुर्मिळ असून जिल्ह्यातील अकोले येथील हे देवस्थान भाविकांचे श्रद्धास्थान आहे. अश्विन महिन्यात नवरात्रात भाविकांची मोठ्या प्रमाणात येथे गर्दी असते. देवस्थानच्या नूतनीकरणाचे काम प्रगतीपथावर असून अनेक भाविक, देणगीदारांकडून देवस्थानला भरीव स्वरुपात देणग्या प्राप्त होत असल्याचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांनी सांगितले.

## पाथर्डीत अक्षर संस्कार शिबिराचे उद्घाटन

**पाथर्डी । वीरभूमी-**



अक्षराच्या विविध छटा आणि त्यांचे आकार याची माहिती अशा शिबिरातून होत असल्यामुळे तुम्हा सर्वांचे अक्षर सुंदर होणार आहेत. अशा नावीन्यपूर्ण शिबिरातून विद्यार्थ्यांनी नवनवीन कला जोपासाव्यात, असे आवाहन डॉ. संतोषकुमार राठोड यांनी केले.

वसंतराव नाईक वाचन मंदिर या संस्थेच्या वतीने शहरातील आनंदनगर येथील श्री सद्गुरू संत सेवादास महाराज मंदिर सभागृहात शालेय विद्यार्थ्यांसाठी ८ मे पासून २३ मे या कालावधीत अक्षर संस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उदघाट्न महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ बालभारती सदस्य कवी डॉ. संतोषकुमार शंकर राठोड यांच्या हस्ते करण्यात आले, त्या प्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी शिक्षक सेनेचे नंदकुमार डाळिंबकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा नेते अशोक चोरमले, जिल्हा ग्रंथालय संघांचे कोषाध्यक्ष विष्णुपंत पवार आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. राठोड म्हणाले की, माणसाच्या किंवा विद्यार्थ्याच्या अंगी एक तरी कला असली पाहिजे. कलेमुळे मेंदू सर्जनशील विचार करतो. सर्जनशीलतेतून नवीन कलाकृती जन्म घेत असते. तीच कलाकृती जगातील सर्वात सुंदर असते. या सुंदर अक्षर शिबिरांमधून नवीन कला तुम्ही सर्व विद्यार्थ्यांनी आत्मसात कराव्यात. या शिबिरात शालेय विदयार्थ्यांना बेसिक कॅलिग्राफी व सुंदर हस्ताक्षर सराव मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना कॅलिग्राफी पेन, मार्गदर्शक पुस्तिका व शैक्षणिक साहित्य मोफत उपलब्ध करून देण्यात आले. सूत्रसंचालन सचिन चव्हाण प्रास्ताविक शिवाजी चव्हाण तर आभार अशोक चव्हाण यांनी मानले.

# तापी प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात ऐतिहासिक करार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला ५.७८ लाख एकर सिंचन लाभ

**नागपूर । वीरभूमी-**

तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये एका ऐतिहासिक करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सुमारे १९,२४४ कोटींच्या या करारामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारपाण पट्ट्याला मोठा लाभ मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भोपाळ येथे दिली.

सिंचन आणि जलविद्युत प्रकल्पांबाबत महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची बैठक आज भोपाळ येथे झाली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, कुंवर विजय शाह आणि दोन्ही राज्यांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना याबाबत माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजचा दिवस हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशसाठी ऐतिहासिक आहे. तापी मेगा रिचार्ज प्रकल्पाचा आम्ही पूर्वीच संकल्प केला होता. आज त्यावर दोन्ही राज्यांनी सहमती केली आणि त्यासाठी सामंजस्य करार झाला. यापूर्वी ही बैठक २००० मध्ये बैठक झाली होती, त्यानंतर २०२५ मध्ये ही बैठक झाली. परंतू या प्रकल्पाबाबत दोन्ही राज्य परस्परांच्या संपर्कात होते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी आंतरराज्य जलकरारांना गती देण्यास सांगितले आणि २०१६ पासून आम्ही याला गती दिली. तापी मेगा रिचार्ज हे जगातील एक आश्चर्य आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला २,३४,७०६ हेक्टरला सिंचनलाभ होईल, तर मध्यप्रदेशला १,२३,०८२ हेक्टर सिंचनलाभ मिळेल. महाराष्ट्रात जिथे खारपाणपट्टा आहे आणि त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या आणि सिंचनाच्या समस्या आहेत, तेथे मोठा लाभ या प्रकल्पामुळे होणार आहे. यात जळगाव, अकोला, अमरावती, बुलढाणा या पट्ट्यात मोठा दिलासा मिळेल. शेतकर्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल. केंद्रीय योजना म्हणून याचा स्वीकार व्हावा, अशी विनंती आता आम्ही दोन्ही मुख्यमंत्री मिळून केंद्र सरकारकडे पुन्हा करणार आहोत.

या बैठकीत महाराष्ट्राचे मुद्दे सुद्धा आम्ही मांडले. त्यात डांगुर्ली बॅरेज, जामघाट असे महत्त्वाचे मुद्दे होते. या जामघाट प्रकल्पासाठी २८ वर्षांपूर्वी मी मध्यप्रदेशात तत्कालिन मुख्यमंत्र्यांसोबत आलो होतो. पण, आता त्यालाही गती मिळते आहे, याचा आनंद आहे. या जामघाटमुळे नागपूर शहरासाठी पुढच्या ३०-४० वर्षांसाठी पाणी मिळणार आहे. आता ऑक्टोबरमध्ये पुढची बैठक घेण्यात येईल. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश कोणत्या क्षेत्रात एकत्रित काम करु शकते, यादृष्टीने सुद्धा अनेक बाबींवर यावेळी चर्चा झाली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.



# जगाला हेवा वाटेल असे ज्ञानपीठ आळंदीत उभारणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा | ज्ञानपीठ तयार करण्यासाठी ७०१ कोटींचा आराखडा तयार

**● पुणे | वीरभूमी–**
‘प्राचीन भागवत धर्मातील सनातन आणि कल्याणकारी विचार जगभरात पोहोचविण्यासाठी आळंदी येथे साडेचारशे एकर जागेत जगाला हेवा वाटेल असे संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्यात येईल,’ अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केली. ज्ञानपीठ तयार करण्यासाठी ७०१ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

आळंदी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. ज्ञानपीठ आपल्या हातून होत असल्याचे समाधान व्यक्त करून, मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ‘ज्ञानपीठ उभारण्यासाठी ७०१ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. ज्ञानपीठाच्या माध्यमातून भारतीय आध्यात्मिक परंपरेतील मानवी कल्याणाचा शाश्वत विचार जगभरात जाईल.’

ह.भ.प. शांतीब्रम्ह गु. मारुती महाराज कुरेकर यांनी भागवत धर्म प्रचारासाठी केलेले कार्य लक्षात घेता, यांना पद्म पुरस्कार मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशात ज्या काळात परकीय आक्रमणांचा मारा वाढला होता आणि भागवत धर्म संकटात सापडला होता, त्या कठीण काळात भागवत धर्माला जिवंत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वारकरी संप्रदायाने केले. म्हणूनच इतकी आक्रमणे झाल्यानंतरही आपला धर्म, संस्कृती आणि विचार कोणीही संपवू शकले नाहीत. वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वर यांनी रचला आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांनी त्यावर कळस चढवला. वारकरी संप्रदायाने जात, पंथ, धर्म विरहित समाज निर्माण करण्याचे काम केले.

आज महाराष्ट्र देशातील क्रमांक १चे राज्य ठरण्यामागे वारकरी संप्रदायाने रुजवलेली संस्कृती आणि अध्यात्मिक परंपरा आहे. जग हे मान्य करत आहे की, भौतिक श्रीमंती ही काही काळ टिकते, पण त्यातून शाश्वत सुख, शांती मिळतेच असे नाही. भारताचे मानसिक स्वास्थ्य आजही टिकून आहे कारण येथे संत परंपरेचे वैभव आहे. प्रत्येक गावात होणारा सप्ताह, भागवत धर्माचा सुविचार आणि काल्याच्या कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक अभिसरणाचे काम केले जाते. भौतिक प्रगती कितीही झाली, तरी अध्यात्मिक बैठकीशिवाय मनः शांती शक्य नाही हे सनातन धर्माने हजारो वर्षांपूर्वी ओळखले होते. म्हणूनच नामस्मरणासारख्या परंपरा निर्माण झाल्या. हीच विचारांची श्रीमंती आपल्या देशाला खऱ्या अर्थाने जगातील सर्वात समृद्ध देश बनवते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

जगातील सर्वात मोठी तीर्थयात्रा म्हणजे पंढरपूरची वारी होय. या वारीचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्यात दिसणारी स्वयंशिस्त. भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेतून दिलेला विचार वारीच्या माध्यमातून रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. संत ज्ञानेश्वर यांनी सर्वसामान्य जनतेसाठी भगवद्गीतेचे ज्ञान मराठीतून ‘ज्ञानेश्वरी’च्या माध्यमातून पोहोचवले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यात ज्ञानेश्वरी ग्रंथाचे मोलाचे योगदान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मंदिर समितीच्या ४५० एकर जागेत ७०१ कोटींच्या निधीतून ‘ज्ञानपीठ’ उभारण्याची घोषणा केली. तसेच इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी विकास आराखडा सर्व मंजुरीसह केंद्राकडे पाठवला असून, या माध्यमातून इंद्रायणी नदी स्वच्छ करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच परमपूज्य ह.भ.प. शांतीब्रम्ह मारोती महाराज कुरेकर यांना पद्म पुरस्कार देण्याची शिफारस राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे केली जाणार असल्याचा विश्वासही व्यक्त केला.

यावेळी आ. उमा खापरे, आ. शंकर जगताप, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख, विश्वस्त आणि वारकरी उपस्थित होते.

ज्ञानेश्वर महाराजांच्या समग्र वाङ्मयाचा साक्षेपी चिंतनात्मक आढावा घेणाऱ्या ‘नमो ज्ञानेश्वरा’ या ग्रंथाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या सोहळ्यात अन्नदान करणाऱ्या जगताप कुटुंबीयांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

इंद्रायणी नदी स्वच्छतेसाठीच्या प्रयत्नांची मागणी मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. ‘इंद्रायणी नदीचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. हा आराखडा सर्व मान्यता घेऊन केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. लवकरच तो मंजूर करून घेण्यात येईल. याद्वारे पिंपरी–चिंचवड महापालिकेसह ३९ गावांतील पाणी शुद्ध करून इंद्रायणीत जाईल. इंद्रायणीचे जल स्वच्छ, निर्मळ आणि पूजनीय होईल असा प्रयत्न आहे,’ असेही ते म्हणाले.

# कुकडी कालवा सल्लागार समितीची बैठक होऊनही अद्याप तारीख जाहीर नाही

### आवर्तनाची तारीख निश्चित न केल्यास १३ मे पासून उपोषण : राजेंद्र मस्के

**● श्रीगोंदा | वीरभूमी–**
कुकडी कालव्याच्या पाण्याच्या आवर्तनासाठी तातडीने निर्णय घ्यावा, या मागणीसाठी पाटपाणी कृती समितीचे अध्यक्ष राजेंद्र म्हस्के यांनी जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. आवर्तन तारीख जाहीर केली नाही तर दि १३ मे पासून श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

पाठवलेल्या निवेदनात श्री. मस्के यांनी म्हटले आहे की कुकडी सल्लागार समितीची बैठक होऊन आठ दिवस उलटले तरी पाणी सोडण्याबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. यामुळे लाभधारक शेतकरी संभ्रमात असून पाण्याअभावी शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी चारा – पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. कुकडी कालव्याद्वारे पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी सोडण्याचे नियोजन असल्याचे समजते. मात्र, आवर्तनाचा



कालावधी केंव्हा सुरू होणार व समाप्तीची तारीख, तालुकानिहाय पाणी वाटप आणि आवर्तन पद्धत याबाबत प्रशासनाने कोणतीही स्पष्टता दिलेली नाही.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी, जनावरांना आणि माणसांना पिण्याच्या पाण्याची गरज असताना प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष होत आहे. राजकीय वादांमुळे तालुक्यातील जनता होरपळत आहे. श्री. मस्के यांनी पुढे आरोप करताना म्हटले आहे की, श्रीगोंद्यावर मागील आवर्तनात अन्याय झाला आहे. गत आवर्तनात श्रीगोंद्याला पाणी मिळाल्यानंतर काही तासांतच आवर्तन उरकण्यात आले, ज्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळाले नाही. निदान या आवर्तनात प्रथम श्रीगोंद्याला पाणी द्यावे आणि नंतर कर्जत व करमाळा तालुक्यांना पाणीवाटप करावे तरच श्रीगोंद्यातील फळबागा, उभी पिके आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.

निवेदनात पुढे म्हटले आहे की पाणी विलंबाने मिळाल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होईल. करमाळा आणि कर्जत तालुक्यांना प्रत्येकी ८ ते १० दिवस पाणी दिल्यास आणि पाणी पोहोचण्यास ५ दिवस लागल्यास श्रीगोंद्यापर्यंत पाणी येण्यास २५ दिवस लागू शकतात. यापूर्वीच्या आवर्तनात करमाळा आणि कर्जतला पुरेसे पाणी मिळाले असताना श्रीगोंदा वंचित राहिला आहे. समस्या उभी राहण्या आधी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी विनंती करताना श्री. म्हस्के यांनी स्पष्ट केले की, १३ मेपर्यंत पाणी सोडले नाही तर ते श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसतील.

# शेतीच्या वादातून दोन कुटुंबात हाणामारी; १६ जणांवर गुन्हा

**● राहुरी | वीरभूमी–**
तालुक्यातील मांजरी येथे शेतीच्या वादातून दोन कुटुंबात तुंबळ हाणामारी झाली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात १६ जणांवर परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सविता आण्णासाहेब विटनोर (वय ३६, रा. मांजरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले, सविता विटनोर यांच्या शेत जमिनीच्या शेजारी काशिनाथ कोंडाजी विटनोर याची शेत जमीन आहे. त्यांनी संपूर्ण शेत गटाची शेत मोजणी केलेली आहे. दि. ६ मे रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास सविता विटनोर या शेतात ऊस तोडणीसाठी गेल्या होत्या. लिलाबाई विटनोर व मनीषा विटनोर या दोघी तेथे येऊन ऊस तोडणीस विरोध करत शिवीगाळ करून विळ्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली.




सविता विटनोर यांच्या फिर्यादीवरून आरोपी लिलाबाई दत्तू विटनोर, मनीषा काशिनाथ विटनोर, पंकज दत्तू विटनोर, चंद्रशेखर दत्तू विटनोर, काशिनाथ कोंडाजी विटनोर, दत्तू कोंडाजी विटनोर (सर्व रा. मांजरी) यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), १८९ (२), १९०, १९१ (१), १९१ (३), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर लिलाबाई दत्तु विटनोर (वय ४०) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या दुसऱ्या फिर्यादीत म्हटले आहे की, लिलाबाई विटनोर यांची मांजरी शिवारात शेती असून शेजारी त्यांचा पुतण्या अजय अण्णासाहेब विटनोर याची शेती आहे. त्यांची शेताची वाटणी झालेली असतानाही आमची काही शेती तुमच्या बाजुने निघते असे, म्हणुन तो नेहमीच वाद करत असतो. दि. ६ मे रोजी सायंकाळी ५ वाजे दरम्यान अविराज विटनोर व त्याचा भाऊ ज्ञानेश्वर विटनोर हे दोघे त्यांचा टॅक्ट्रर घेवुन आले व लिलाबाई यांच्या शेतातील उसाचे पिकात घातला. त्यावेळी शिवीगाळ करु लागले. तेव्हा लिलाबाई म्हणाल्या मोजणी करुन जमीन काढून घ्या, पण मला शिवीगाळ करू नका. त्यावेळी आरोपींनी लिलाबाई विटनोर यांना शिवीगाळ करुन लाकडी, काठी गज व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच ही शेती आमची आहे, तेथे आम्हाला आडवे आले तर टॅक्ट्रर खाली घालु व घरी येवुन जाळुन मारु, अशी धमकी दिली. मारहाणीत लिलाबाई यांचा मुलगा पंकज विटनोर याचा मोबाईल गहाळ झाला.

घटनेनंतर लिलाबाई विटनोर यांच्या फिर्यादीवरून आरोपी अविराज कैलास विटनोर, ज्ञानेश्वर कैलास विटनोर, सचिन भाऊसाहेब विटनोर, गणेश भाऊसाहेब विटनोर, विजय आण्णासाहेब विटनोर, सविता आण्णासाहेब विटनोर, अजय अण्णासाहेब विटनोर (सर्व रा. मांजरी) तसेच पंकज शेरमाळे, बाळासाहेब सतु शेरमाळे व भाऊसाहेब शेरमाळे (रा. केंदळ) या दहा जणांवर भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), १८९ (२), १९०, १९१ (१), १९१ (३), ३२४ (२), ३२९ (३), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सुनील फंड यांची महासचिवपदी निवड

**● नगर | वीरभूमी–**
महाराष्ट्र परिट धोबी सेवा मंडळाचे प्रदेशाध्यक्ष खंडेराव कडलग व वरिष्ठ पदाधिकारी बैठकीत राज्य कार्यकारिणीच्या महासचिव पदी सामाजिक कार्यकर्ते सुनील फंड यांची निवड करण्यात आली.

सुनील फंड यांनी कोपरगाव परिट धोबी सेवा मंडळाचे शहराध्यक्ष, त्यानंतर जिल्हाध्यक्ष असताना विविध उपक्रम राबविले. त्यांच्या प्रयत्नाने कोपरगाव शहरात २००४ पासुन पाच गुंठे क्षेत्रावर गाडगेबाबा सांस्कृतिक भवनाचे काम प्रगती पथावर आहे. सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन जिल्ह्यात सर्वात मोठं राष्ट्रसंत गाडगेबाबा सांस्कृतिक भवन उभारण्यात येणार आहे. त्या ठिकाणी गोरगरिबांना अल्पदरात साखरपुडा, लग्न प्रसंगी देण्यात येईल. त्यांना पाच वेळा विविध सामाजिक संस्थांकडून समाजभूषण पुरस्कारासाठी सन्मानित करण्यात आले. राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या सुनील फंड यांनी कोपरगाव तालुक्यात स्वतःचं अस्तित्व तयार करून कोपरगाव तालुक्यात साई गावपालखी सोहळा, मुंबादेवी तरुण मंडळाचे वतीने गेल्या तीन वर्षांपासून १४८० मुलींना मर्दानी खेळ, लाठी काठी, तलवार बाजी, दांडपट्टा खेळाची सुरुवात केली. आजही अविरतपणे चालू आहे. करोना काळात दोन महिने साईगाव पालखी सोहळ्याच्यावतीने २ हजार ५०० जणांना रोज २ वेळा घरपोहच जेवणाची डबे पुरवले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत समाजाच्यावतीने त्यांना महासचिव पद बहाल केले आहे.

# प्राध्यापकावर चाकू हल्ला करणारे जेरबंद

**● नगर | वीरभूमी–**
शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पुलाजवळ प्राध्यापकावर लुटमारीच्या उद्देशाने करण्यात आलेल्या चाकू हल्ल्याप्रकरणी दोन संशयित आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. तर एक संशयित आरोपी अद्यापही पसार असून, पोलिस त्याच्या मागावर आहेत. गुन्ह्यात वापरलेली ९० हजार रुपये किंमतीची मोपेड देखील जप्त करण्यात आली आहे. निखील विकास बोरकर (रा. पुसद, जि. यवतमाळ) हे ६ मे रोजी पहाटे सुमारास श्वासोच्छवासास त्रास होऊ लागल्याने घराबाहेर पडले होते. रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पुलावरून जात असताना तीन अज्ञात इसम मोपेडवरून आले आणि त्यांनी त्यांना अडवले. खिसे तपासूनही काहीही न मिळाल्यामुळे त्यांनी बोरकर यांचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. बोरकर यांनी प्रतिकार केल्यामुळे त्यांच्यावर चाकूने हात व पाठीवर वार करण्यात आले. संशयित आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. घटनेनंतर कोतवाली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. यात प्रविण राजू चांदणे (वय १९) आणि राहुल राजू भोसले (वय २०, दोघेही रा. सिद्धार्थनगर, नगर) यांना अटक करण्यात आली. हे दोघेही मोपेडवर असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्यांना सिद्धार्थनगर येथे सापडल्यावर ताब्यात घेतले. तिसरा संशयित आरोपी गणेश विजय लोमटे (रा. प्रेमदान हाडको, नगर) पसार असून त्याचा शोध सुरू आहे.

# नगरला एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा

**● नगर | वीरभूमी–**
अहिल्यानगर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुळानगर पाणी योजनेवरील उपसा पंप नादुरुस्त झाल्यामुळे शहरासह उपनगर भागात एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

मुळानगर पंपीग स्टेशन येथे ७२५ एचपीचे दोन पंप व ४०० एचपीचे २ पंप नियमित चालवून शहरास पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस असल्याने धरणाची पातळी खालवली आहे. त्यामुळे ४०० एचपीचा पर्यायी पंप चालवावा लागत आहे. हा पर्यायी पंप शुक्रवारी रात्री नादुरूस्त झाला आहे. तसेच ७२५ एचपीचा पर्यायी पंपही दुरूस्ती चालू असल्याने बंद आहे. त्यामुळे सद्यस्थितीत अतिरिक्त पंप उपलब्ध नसल्याने मुळानगर येथून होणारा पाण्याचा उपसा कमी झालेला आहे. त्यामुळे शहरातील प्रत्येक भागात एक दिवसाने उशिरा पाणीपुरवठा होणार आहे.

शनिवार (दि. १०) बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर, तसेच सारस नगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर–कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर भागास पाणी पुरवठा झालेला नाही. या भागात रविवारी (दि.११) पाणी पुरवठा होणार आहे. तर, रविवारी रोटेशन नुसार पाणी वाटप असलेल्या सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने मनपा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी या भागात सोमवारी (दि.१२) पाणी सोडण्यात येणार आहे. सोमवारी पाणी पुरवठा होऊ घातलेल्या मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टीव्ही सेंटर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर या भागात मंगळवारी (दि.१३) पाणी पुरवठा होणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.